दिवाणी न्यायाधीश, क-स्तर व न्यायदंडाधिकारी प्र. व. सु. प. 2021

2021 दि. 2 जुलै, 2022 **J15**

# PAPER - I / पेपर क्रमांक - I 10801

**Civil Procedure Code, Transfer of Property Act, Specific Relief Act, Law of Contracts, Sale of Goods Act and Partnership Act**

**सिव्हिल प्रोसिजर कोड, ट्रान्सफर ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट, स्पेसिफिक रिलीफ ॲक्ट, लॉ ऑफ कॉन्ट्रॅक्ट्स, सेल ऑफ गुड्स ॲक्ट तसेच पार्टनरशिप ॲक्ट**

**Time : 3 Hours** | **Max. Marks : 100**

**वेळ : 3 तास** | **कमाल गुण : 100**

---

*Note / **सूचना** :*

(1) *All questions are **compulsory**.*
*सर्व प्रश्न सोडविणे **आवश्यक** आहे.*

(2) *Question No. **1** carries **20** marks. All other questions carry **equal** marks i.e., **16** marks **each**.*
*प्रश्न क्रमांक **1** ला **20** गुण असून उर्वरित **सर्व** प्रश्नांना **समान** म्हणजेच **16** गुण आहेत.*

(3) *Your answers must be to the point, wherever possible quoting the specific provision of law.*
*उत्तरे मुद्देसुद असावीत, आवश्यक तेथे कायद्यातील तरतुदी नमूद कराव्यात.*

(4) *Do not reproduce any question. Write only question's number against the answer.*
*उत्तरपुस्तिकेमध्ये प्रश्न पुन्हा लिहू नयेत. फक्त प्रश्न क्रमांक नमूद करून उत्तर लिहावे.*

(5) *Wherever option has been given only the required number of responses in the serial order attempted shall be assessed. Excess responses shall be ignored.*
*ज्या क्रमाने उमेदवाराने ऐच्छिक प्रश्न सोडविलेले असतात त्या क्रमाने अपेक्षित प्रश्नसंख्येइतक्या प्रश्नांची उत्तरे फक्त तपासली जातील व उर्वरित अतिरिक्त ठरणाऱ्या प्रश्नांची उत्तरे तपासली जाणार नाहीत.*

(6) *"Other than cited cases, candidate should not write roll number, any names (including their own), signature, address or any indication of their identity anywhere inside the answer book otherwise he will be penalised".*
*"उदाहरणादाखल दिलेल्या प्रकरणाशिवाय उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वत:चे किंवा इतरांचे नाव, सही, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करू नये. अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल."*

(7) *English version of the question shall be authentic in case of any type of ambiguity.*
*कोणत्याही प्रकारच्या संदेहाच्या स्थितीत, **इंग्रजी** भाषांतर अधिकृत समजले जाईल.*

(8) *All questions can be attempted only in one language either in **English** or in **Marathi** as per the option given in the application form.*
*उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या पर्यायानुसार **सर्व** प्रश्नांची उत्तरे **इंग्रजी** किंवा **मराठी** यापैकी एकाच भाषेत लिहिली पाहिजेत.*

(9) *Candidates are expected to answer all the subquestions of a question together. If subquestion of a question is attempted elsewhere (after leaving a few pages or after attempting another question) the later subquestion shall be overlooked.*
*उमेदवाराने प्रत्येक प्रश्नातील उपप्रश्नांची उत्तरे एकत्र सोडवावयाची आहेत. प्रश्नातील एक उपप्रश्न एकीकडे व दुसरा दुसरीकडे (काही पृष्ठे सोडून वा अन्य प्रश्न सोडवून तदनंतर) सोडवल्यास, दुसरा उपप्रश्न दुर्लक्षित केला जाईल.*

---

SEAL

1. Write a judgment on following facts.

You must pay attention to following points :

(a) Judgment must be in proper format;

(b) Frame proper issues and record findings on them;

(c) Conclude the judgment with operative order.

खाली नमूद केलेल्या कथनावरून न्यायनिर्णय लिहा :

पुढील मुद्दे विचारात घेणे आवश्यक आहे :

(अ) न्यायनिर्णय विहीत नमून्यात असणे आवश्यक आहे;

(ब) योग्य मुद्दे काढावे आणि त्यांचे निष्कर्ष द्यावेत;

(क) अंतिम आदेशाने न्यायनिर्णयाचा शेवट करावा.

**Facts for Judgment :**

**Plaintiff's Case is as follows :**

Ram and Prakash are friends. Prakash is cloth merchant and Ram is L.I.C. agent. Both were having financial transactions in the past. Prakash was in need of money, therefore on dt. 5.2.2020 he approached Ram and requested to lend him an amount of ₹ 1,00,000/- for business purpose. Ram extended the said amount to Prakash on dt. 6.2.2020 by withdrawing it from his bank account. Prakash had promised to return the said amount within 6 months. It was agreed between them that no interest will be charged on the said amount, if the same is returned within stipulated period.

Prakash failed to return the said amount within 6 months. Therefore on dt. 1.11.2020 Ram issued notice through his Advocate to Prakash calling upon him to return the amount within 7 days. Prakash received the said notice on dt. 5.11.2020. There after Prakash issued a cheque bearing No. 56789 dt. 10.11.2020 drawn on Bank of Baroda, Gandhi Nagar branch, Kolhapur for ₹ 1,00,000/- in favour of Ram. On dt. 11.11.2020 Ram presented the said cheque in his bank. The said cheque came to be dishonoured due to "funds insufficient" in the account of Prakash.

Again on dt. 15.11.2020 Ram issued notice through his Advocate to Prakash calling upon him to make full payment on or before dt. 25.11.2020. Prakash received the said notice on dt. 17.11.2020 but he failed to comply with the same. Hence Ram has filed the present suit against Prakash for recovery of ₹ 110,000/-. The claim includes interest from the date of expiry of 6 months and notice charges. Future interest is also claimed.

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**Defence taken in the written statement**

Prakash admits that he had taken the amount from Ram in the past, but this time he denied to have taken the amount from Ram, as claimed. He had taken insurance policy through Ram and had issued blank signed cheque towards payment of policy premium. Ram has misused the said cheque.

Ram has filed complaint under Sec. 138 of Negotiable Instrument Act against him in respect of the said cheque which is pending. He denied specifically all other adverse averments in the plaint.

Parties have adduced evidence. Imagine the evidence and record findings.

**न्यायनिर्णयाकरिता तथ्ये :**

**वादीची कथने खालीलप्रमाणे :**

राम आणि प्रकाश मित्र आहेत. प्रकाश हा कापडाचा व्यापारी आहे आणि राम एल.आय.सी. एजंट आहे. दोघा मधे पूर्वी आर्थिक देवाण घेवाणीचे व्यवहार झालेले होते. प्रकाशला पैशाची गरज असल्यामुळे तो दि. 5.2.2020 रोजी राम कडे गेला आणि त्यांनी ₹ 1,00,000/- ची व्यापारासाठी मदत करावी अशी विनंती केली. राम ने आपल्या बँकेच्या खात्यातून तितकी रक्कम काढून दि. 6.2.2020 रोजी प्रकाशला दिली. प्रकाशने सदरची रक्कम 6 महिन्याच्या आत परत करण्याचे आश्वासन दिले होते. त्यांच्या मधे असे ठरले होते कि जर रक्कम सदर कालावधीत परत केल्यास त्यावर व्याज आकारले जाणार नाही.

सदरची रक्कम 6 महिन्याच्या कालावधीत परत करण्यास प्रकाश असमर्थ ठरला. म्हणून दि 1.11.2020 रोजी राम ने आपल्या वकिला मार्फत प्रकाशला नोटीस देऊन रक्कम 7 दिवसाच्या आत परत करण्यास कळविले. सदर नोटीस प्रकाशला दि. 5.11.2020 रोजी मिळाली. त्यानंतर प्रकाशने बँक ऑफ बडोदा, शाखा गांधीनगर, कोल्हापूर यावर काढलेला ₹ 1,00,000/- चा दि. 10.11.2020 चा धनादेश क्र. 56789 रामला दिला, दि. 11.11.2020 रोजी सदरील धनादेश राम ने आपल्या बँकेत जमा केला असता प्रकाशच्या खात्यात "अपर्याप्त निधी" असल्याने धनादेश नाकारण्यात आला.

दि. 15.11.2020 रोजी राम ने पुन्हा वकिला मार्फत प्रकाशला नोटीस पाठवून संपूर्ण रक्कम दि. 25.11.2020 रोजी किंवा त्यापूर्वी परत करण्यास कळविले. ती नोटीस प्रकाशला दि. 17.11.2020 रोजी प्राप्त झाली. परंतू तो नोटीसची पुर्तता करू शकला नाही. त्यामुळे राम ने प्रकाश विरूद्ध ₹ 110,000/- वसुली करिता प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. सदर रकमेत 6 महिन्याच्या नंतरच्या व्याजाची रक्कम व नोटीस शुल्क चा समावेश आहे. तसेच पुढील व्याजाच्या रकमेची मागणी केली आहे.

P.T.O.

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**प्रतिवादीचा बचाव/कैफियत खालील प्रमाणे :**

प्रकाश ने मान्य केले कि त्यांनी पूर्वी राम कडून उसने पैसे घेतले होते, परंतू ह्या वेळेस वाद कथनाप्रमाणे राम कडून पैसे घेतल्याचे त्यांनी नाकारले. त्यांनी राम मार्फत विमा पॉलिसी काढली होती आणि त्या विम्याचा हप्ता भरण्यासाठी सही असलेला कोरा धनादेश दिला होता. राम ने सदर धनादेशाचा दुरुपयोग केला.

सदर धनादेशाबाबत राम ने त्याच्या विरुद्ध कलम 138 परक्राम्य लेख अधिनियम अन्तर्गत फिर्याद दाखल केली आहे ती न्यायप्रविष्ट आहे. त्यानी वादपत्रातील इतर सर्व प्रतिकुल कथने स्पष्टपणे नाकारले.

दोघांनी आपले पुरावे सादर केले. आपल्या कल्पनाशक्ती प्रमाणे दोन्ही बाजूंचा पुरावा आहे असे समजावे.

---

**2.** Write short notes on **any four** of the following :

(a) Transfer of property for benefit of unborn person.

(b) Rule against perpetuity under Transfer of Property Act.

(c) In which cases plaint can be rejected ?

(d) What are the consequences of disobedience or breach of injunction ?

(e) When partner may be retired ?

(f) Insolvency of a partner.

खालीलपैकी **कोणत्याही चार** विषयावर थोडक्यात टिप्पणी लिहा :

(अ) न जन्मलेल्या व्यक्तिच्या लाभार्थ मालमत्तेचे हस्तांतरण.

(ब) मालमत्ता हस्तांतरण अधिनियम अन्तर्गत शाश्वतता विरोधी नियम.

(क) कोणत्या प्रकरणात वादपत्र नाकरण्यात येते ?

(ड) मनाई हुकुमाची अवज्ञा अथवा भंग केल्याचा परिणाम.

(इ) भागीदार केव्हा निवृत्त होऊ शकतो ?

(फ) भागीदाराची दिवाळखोरी.

---

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**3.** Write short notes on **any four** of the following :

(a) Conditional transfer

(b) Transfer by ostensible owner

(c) When cancellation of instruments may be ordered ?

(d) How dispute can be settled outside the court and modes of Alternate dispute resolution

(e) Undue influence

(f) Misrepresentation

खालीलपैकी **कोणत्याही चार** विषयावर थोडक्यात टिप्पणी लिहा :

(अ) सशर्त हस्तांतरण

(ब) वरकरणी मालकाकडून हस्तांतरण

(क) संलेख रद्द करण्याचा आदेश केंव्हा देता येईल ?

(ड) न्यायालयाच्या बाहेर दाव्यांची तडजोड कशा प्रकारे करता येईल आणि वैकल्पिक वाद निवारणाचे प्रकार

(इ) अवाजवी दडपण

(फ) विपर्यास (चुकीचा अर्थ)

---

P.T.O.

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

4. Answer **any two** of the following :

(a) Right of mortgagor to redeem. Explain.

(b) When court may pass an order of attachment before Judgment and when such attachment shall be void ?

(c) What are the mutual rights and liabilities of partners ?

खालीलपैकी **कोणत्याही दोन** उप-प्रश्नांची उत्तरे लिहा :

(अ) गहाणकाराचा विमोचन करण्याचा अधिकार, विवेचन करा.

(ब) न्यायालय न्याय निर्णयापूर्वी जप्तीचा आदेश केंव्हा करू शकेल आणि सदर जप्तीचा आदेश केव्हा रद्दबातल ठरेल

(क) भागीदारांचे अन्योन्य अधिकार व दायित्वे कोणते ?

---

5. Answer **any two** of the following :

(a) When injunction can not be granted under Specific Relief Act ?

(b) Perpetual injunction and Mandatory injunction. Explain in detail.

(c) Define - "unpaid seller" and what are its right ?

खालीलपैकी **कोणत्याही दोन** उप-प्रश्नांची उत्तरे लिहा :

(अ) विनिर्दिष्ट अनुतोष अधिनियम अन्तर्गत मनाई हुकूम केंव्हा देता येऊ शकत नाही ?

(ब) निरंतरचा मनाई हुकूम आणि आदेशात्मक मनाई हुकूम. सविस्तर विवेचन करा.

(क) "अप्राप्त मूल्य विक्रेता" ची व्याख्या आणि त्याचे अधिकार काय ?

---

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

6. Write short notes on **any four** :

(a) Transfer by one co-owner.

(b) Rights and liabilities of the lessor.

(c) Procedure for service of summons when defendant refuses to accept service or can not be found.

(d) What is a sound mind of a person for the purpose of contracting ?

(e) Sale of goods by a person not the owner.

(f) Buyer's right of examining the goods.

खालीलपैकी **कोणत्याही चार** विषयांवर थोडक्यात टिप्पणी लिहा :

(अ) एका सहमालकाकडून हस्तांतरण.

(ब) पट्टाकाराचे अधिकार व दायित्वे.

(क) प्रतिवादी ने समन्स घेण्यास नकार दिल्यास किंवा तो न सापडल्यास त्या बाबतीतील समन्स बजावण्याची कार्यपद्धती.

(ड) संविदेच्या उद्देशासाठी व्यक्तीची स्वस्थचित काय आहे ?

(इ) मालक नसलेल्या व्यक्तीकडून मालाची विक्री.

(फ) मालाची तपासणी करण्याचा खरेदीदाराचा अधिकार.

---

-o0o-

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial